(1)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


दूरध्वनी : २०२ ६२४१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


२१.

क्र.मजीप्रा/सस/आ-4/सभा/

दिनांक : .1./11/97

प्रति,

अध्यक्ष, महा.जीवन प्राधिकरण
तथा मंत्री, ग्राम विकास पा.पु.व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सह अध्यक्ष, महा.जीवन प्राधिकरण,
तथा मंत्री, नगर विकास,
मंत्रालय, मुंबई 32.

उपाध्यक्ष, महा.जीवन प्राधिकरण
तथा राज्यमंत्री नगर विकास पा.पु.व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा.जीवन प्राधिकरण तथा
अपर मुख्य सचिव पा.पु.व स्व.विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य,महा.जीवन प्राधिकरण
तथा प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई 32

सदस्य, महा.जीवन प्राधिकरण
तथा प्रधान सचिव वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा.जीवन प्राधिकरण,
तथा सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

..2..

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण
तथा सचिव, आरोग्य विभाग
मंत्रालय मुंबई. 32.

सदस्य, महा.जीवन प्राधिकरण
तथा सचिव, उद्योग, ~~ऊर्जा व कामगार विभाग~~,
मंत्रालय, मुंबई 32.

महापौर, नागपूर महानगरपालिका
तथा सदस्य महा.जीवन प्राधिकरण

अध्यक्ष, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
तथा सदस्य महा.जीवन प्राधिकरण.

श्री.सुरेश पटवर्धन,
सदस्य महा.जीवन प्राधिकरण,
पुणे.

श्री.माधव कुलकर्णी,
सदस्य, महा.जीवन प्राधिकरण,
पुणे.

श्री.आदिनाथ नवले पाटील,
सदस्य, महा.जीवन प्राधिकरण,
नवा मोंढा, ता.जि.बीड.

श्री.भानुदास पाडळकर,
सदस्य, महा.जीवन प्राधिकरण,
सांगली.

श्री.आशिष कुलकर्णी,
सदस्य,महा.जीवन प्राधिकरण,
वरळी, मुंबई 25.

श्री.राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महा.जीवन प्राधिकरण,
नागपूर.

श्री.जे.एस.साहनी,
सदस्य सचिव(प्रशासन व बाह्य अर्थसहाय्य)
महा.जीवन प्राधिकरण,
मुंबई 21.

(३)

श्री. राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव ( तांत्रिक)
महा. जीवन प्राधिकरण,
मुंबई –21

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 76वी सभा.

संदर्भ : या कार्यालयाचे दि.5.11.97 चे पत्र क्र.1097 / सभा–76 / आ–4 अन्वये पाठविण्यात आलेली कार्यक्रम पुस्तीका.

महोदय,

वरील विषयी संदर्भित पत्रान्वये दिनांक 17.11.1997 रोजी होणा–या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 76व्या सभेची कार्यक्रम पुस्तीका आपणास सादर करण्यात आली आहे. या पुस्तिकेतील कार्यसूचिमधील अ.क्र.1 व 2 च्या पुढे नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम बाब क्र.1 व बाब क्र.2 समाविष्ट असलेली पुस्तीका भाग–2 सोबत सादर करीत आहे.

आपला विश्वासू,
नि.कृ.माडा
( नि.कृ.माडा )
मुख्य प्रशासकीय अधिकारी.

**सोबत** : वरिल प्रमाणे
कार्यक्रम बाबी.

प्रतिलिपी,

**मुख्य अभियंता**, कोकण प्रदेश ठाणे /पुणे / नाशिक /औरंगाबाद /अमरावती / नागपूर / जागतिक बँक, ठाणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

**मुख्य** प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**वित्तीय** सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महा.जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.

**प्रत माहितीसाठी,**

**अधीक्षक** अभियंता, मुख्यालय / मनिसंवसं कक्ष, महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.

**उप मुख्य** लेखाधिकारी, 1/2/3, महा. जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.

**आस्थापना** अधिकारी ( दक्षता ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

जनसंपर्क अधिकारी ,महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रशासकीय** नि आस्थापन अधिकारी, महा. जीवन प्राधिकरण, नवी दिल्ली.

(8)

कार्यक्रम बाब क्र.1.

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 75 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दि.15/10/97 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 75 व्या सभेचे इतिवृत्त 76 व्या सभेच्या अनुषंगाने मान्यतेसाठी दि.11/11/97 रोजी पत्र क्र.1097/सभा-75/आ-4 अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यांत आले आहे. ते सभेने मंजूर करावेत.

8. श्री.आदिनाथ नवा पाटील,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नवा मोंढा, बीड.

9. श्री. भानुदास पडळकर,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सांगली.

10. श्री. आशिष कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
वरळी, मुंबई.

11. श्री.राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नागपूर.

12. श्री.जे.एस.साहनी,
सदस्य सचिव, (प्रशासन व बाह्य अर्थसहाय्य),
महा.जीवन प्राधिकरण, मुंबई–21.

13. श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव,(तांत्रिक),
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई.21.

प्राधिकरणाच्या सभेत उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांची रजा मंजूर करणेत आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी "विशेष निमंत्रित" म्हणून उपस्थित होते:–

1) श्री.शे.दौ. अरमाळ, मुख्य अभियंता (कोकण विभाग)
2) श्री.सु.का. पाटील, मुख्य अभियंता (नाशिक विभाग)
3) श्री.नि.कृ. माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
4) श्री.भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

<u>कार्यक्रम बाब क्र.1 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 75 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे :–</u>

सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी असे निवेदन केले की, 75 व्या सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यात आले असून या इतिवृत्तावर कोणत्याही सदस्यांकडून कोणतीही सूचना अथवा बदल कळविण्यात आला नसल्यामुळे सभेने या इतिवृत्तास मान्यता द्यावी. यावर माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, 75 व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र.9 च्या अनुषंगाने असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, ज्या अधिका–यांची विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रलंबित आहे अशा अधिका–यांना पदोन्नती ज्या ठिकाणी ते अधिकारी कार्यरत असतात त्याच ठिकाणी त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये. परंतु या विषयावर प्राधिकरणाने कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही. याच विषयास समरुप असलेल्या दुस–या

प्रकरणासंबंधी सदस्यांनी असाही मुद्या उपस्थित केला की, नागपूर विभागात काही प्रकरणी कर्मचारी सेवानिवृत्त होऊनही त्यांची चौकशी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली नाहीत. यावर सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सदस्यांच्या असे निर्दशनास आणून दिले की, या प्रकरणी केलेली कार्यवाही कार्यक्रम बाब क्र.2 मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे. कार्यक्रम बाब क्र.2 मध्ये या बाबीवर केलेली कृती निर्दशनास आणून दिली जाईल तेव्हा या प्रकरणी हया मुद्यावर चर्चा करावी. इतिवृत्तास मान्यता देतांना मागील सभेत जे कामकाज झाले त्याचा उल्लेख जसाचतसा झाला आहे किंवा नाही एवढेच सदस्यांनी बघावे व चर्चा करु नये असे माननीय अध्यक्षांनी सुचविले. त्यानंतर कार्यक्रम बाब सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

<u>कार्यक्रम बाब क्र.2 : प्राधिकरणाच्या 75 व्या सभेतील कार्यक्रम बाबीवर करण्यात आलेली कृती :—</u>

प्राधिकरणाच्या 75 व्या सभेत चर्चा झालेल्या कार्यक्रम बाबीवर करण्यात आलेली कृती प्राधिकरणाचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सभेपुढे वाचून दाखविली.

केलेल्या कृतीमधील कार्यक्रम बाब क्र.5 वरील कृतीच्या अनुषंगाने सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, या प्रकरणी वर्तमानपत्रामध्ये ठरल्याप्रमाणे निविदेची जाहिरात देण्यात आली असली तरी या निविदेची प्रत मात्र सदस्यांना पाठविण्यात आलेली नाही. अशा प्रकारच्या (अनेक वेळा पुन्हाः पुन्हाः मागविण्यात आलेल्या निविदांच्या प्रकरणी) निविदांतर्गत कामांचा अभ्यास करण्यासाठी निविदेची प्रत सदस्यांना पुरविण्यात यावी. तसेच असाही अनुभव आलेला आहे की, निविदेसाठीची जाहिरात वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्यानंतरही पुढील 10 ते 15 दिवसापर्यंत संबंधीत कार्यालयात निविदा संचच तयार झालेले नसतात. तेंव्हा असा प्रकार टाळण्यासाठी निविदा मागविण्यासंबंधी जाहिरात देण्यापूर्वी निविदा संच तयार असावेत.यावर प्राधिकरणाचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सहमती दर्शवून काही प्रकरणी निविदा वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे मान्य केले व या प्रकरणी पुढे सुधारणा करुन अशाप्रकारे पुनरावृत्ती न होण्यासाठी संबंधीत अधिका--यांना सूचना देण्यात येतील असे सांगितले.

प्रत्येक निविदेची प्रत सर्व सभासदांना पाठविणे उचित होणार नाही. तथापि, आवश्यक भासेल तेंव्हा निविदेची प्रत मध्यवर्ती कार्यालयात मा.सदस्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी अशी सूचना मा.अध्यक्षांनी केली व केलेल्या कृतीस सर्वानुमते मान्यता दर्शविण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.7 वरील केलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करतांना अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे विचारले की, 1995—96 या आर्थिक वर्षाचा आर्थिक अहवाल व प्रशासकीय अहवाल येत्या नागपूर येथील अधिवेशनात सदनापुढे सादर होण्यासाठी तो दि. 5.12.1997 रोजी तयार होईल असे बघावे. तसेच 1996—97 चे अहवालही लवकर तयार करावेत.

कार्यक्रम बाब क्र.9 च्या संदर्भात सदस्यांनी उपस्थित केलेल्या अधिका--यांच्या एकाच कार्यालयातील पदोन्नतीच्या संदर्भात तसेच त्यांच्यावरील चौकशी प्रकरणांच्यासंबंधीच्या मुद्याबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी असे सूचित केले की अेखाद्या अधिका—याची विभागीय चौकशी चालू असेल तर ती चौकशी पूर्ण होईपर्यंत त्याचे विरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकार प्राधिकरणास नाहीत. त्यांनी असेही सांगितले की येत्या सहा महिन्यांत (चालू असलेल्या) विभागीय चौकशा पूर्ण करुन प्रशासनात सुधारणा झालेली दिसेल. त्याचप्रमाणे संबंधीत अधिका--यांना पदोन्नती देतेवेळी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी चालू होती किंवा कसे ही बाब पुन्हाः तपासून ती पुढील सभेत सादर करण्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी मान्य केले.

एस्केलेशन क्लेम ठेकेदारांना नियमाप्रमाणे देय नसताना मंजूर करुन अदा करण्यात आले आहेत तसेच ही बाब निर्दशनास आली तेंव्हा मात्र वसुलीची कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे. मुळातच एस्कलेशन देय नसताना ते मंजूर करणे ही कृती उचित नाही तेंव्हा या प्रकरणी तावडतोब चौकशी करुन संबधीतांवर कार्यवाही करणे उचित ठरेल व अशी प्रकरणे पुन्हा: घडणार नाहीत असे सदस्यांनी निर्दशनास आणून दिले. तसेच अशा प्रकरणी संबंधीत अधिका–यांकडे लेखी तक्रार करुनही त्या अधिका–याकडून योग्य अशी उत्तरे दिली जात नसतील तर अशा प्रकरणी करावयाची तक्रार मुख्य कार्यालयाकडे केल्यास संबंधित अधिका–यास त्या प्रकरणावर तातडीने कार्यवाही करण्यासंबंधी सूचना देण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे कळविण्यात येईल असे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सदस्यांचे निर्दशनास आणून दिले.

नाशिक येथील प्रशिक्षण केंद्रामार्फत विविध विषयावर प्रशिक्षण देण्यात येते अशा प्रकारे प्रशिक्षणाची व्यवस्था नागपूर येथे देखील संशोधन व प्रशिक्षण केंद्र उघडण्यात येवून नागपूर तसेच जवळपासच्या कर्मचा–यांना प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याची सूचना सदस्यांकडून करण्यात आली. यावर असे सांगण्यात आले की, सद्यस्थितीत नागपूर येथे वेगवेगळया विषयांवरील प्रशिक्षण वर्ग आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येत असतात. त्यामुळे नागपूर येथे आणखी एका प्रशिक्षण केंद्राची तशी आवश्यकता नसल्याचे सदस्यांचे निर्दशनास आणून देण्यात आले.

वरीलप्रमाणे 75 व्या सभेतील मंजूर/नामंजूर बाबीवर केलेल्या कृतीवर सविस्तर चर्चा होऊन केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

<u>कार्यक्रम बाब क्र.3 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी शहारातील कार्यालयांसाठी इमारत व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थान बांधणेबाबत :–</u>

सदर कार्यक्रम बाब सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सविस्तर कथन केली व असेही निर्दशनास आणून दिले की, प्रस्तावित इमारतीची जागा ही प्राधिकरणाच्या मालकीची आहे. यावर सदस्यांनी असा मुद्या उपस्थित केला की, प्रस्तावासोबत सविस्तर अंदाजपत्रक जोडण्यात आलेले नाही. तसेच प्रस्तावित इमारतीच्या अनुषंगाने वास्तुविशारद (Architect) यांचेकडून प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे काय? अशा प्रकारची बांधकामे खाजगी बिल्डरकडून करुन घेतल्यास सध्याच्या प्रस्तावित रक्कमेपेक्षा कमी रक्कमेत चांगल्या प्रकारची इमारत तयार करुन मिळू शकेल अशीही सूचना सदस्यांनी मांडली. शासकीय इमारतींची कामे करताना इमारतीचे नकाशे व आराखडे वास्तुविशारद यांचेकडून मंजूर करुन घेण्याचे शासनास बंधनकारक नाही असे तांत्रिक सदस्यांनी निर्दशनास आणून दिले. इमारत बांधकामाच्या प्रकरणी प्राधिकरणावर वास्तुविशारदाची नेमणूक करण्यात यावी अशी सूचना सदस्यांनी मांडली. त्यावर सदस्य सचिव (प्रशासन) यांनी असे सुचविले की, प्राधिकरणावर वास्तुविशारदाची नेमणूक करणे उचित होणार नाही परंतु अशा प्रकारच्या कामांच्या संदर्भात वास्तुविशारदाकडे कामाचा आराखडा व नकाशा पाठवून तो मंजूर करुन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे अधिक सोईचे होईल. यावर मा.उपाध्यक्ष यांनी असे सुचविले की, रत्नागिरी परिसरात बांधकामाचे दर कमी असल्यामुळे प्रस्तावित खर्च फार अधिक वाटतो यापेक्षा स्वतंत्र इमारत विकत घेतली तरीही एवढा खर्च होणार नाही.

अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनीही अशी सूचना केली की, प्रस्तावित आराखडयात इतर बाबीवरील खर्च मोठया प्रमाणात दाखविण्यात आलेला आहे. तो फारच जास्त वाटतो. याबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी अशी सूचना केली की, अंदाजपत्रक फक्त इमारतीच्या स्थापत्य कामापुरतेच मर्यादित ठेवावे व फर्निचर वगैरे सारख्या बाबींसाठी (ज्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेण्याची गरज नाही) स्वतंत्र अंदाजपत्रके यापुढे तयार करावीत. सर्व उपस्थित सदस्यांनी केलेल्या आग्रहास्तव

अंतिमतः असे ठरविण्यात आले की, सदर कार्यक्रम बाब तत्वतः मान्य करण्यांत येत असली तरी इमारतीच्या बांधकामासंबंधी सर्व माहिती वास्तुविशारदास उपलब्ध करुन देवून त्यांचेकडून आराखडे तयार करुन घेण्यात यावे व अंदाजपत्रके रास्त असल्याचे प्रमाणपत्र घ्यावे व त्याप्रमाणे प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.4 : बीड येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मंडळ कार्यालय उघडणेबाबत :–**

बीड येथे प्राधिकरणाचे मंडळ कार्यालय नव्याने निर्माण करण्याबाबतची कार्यक्रम बाब सदस्य सचिवांनी सभेत ठेवली. यावर सविस्तर चर्चा होऊन या मंडळ कार्यालयाच्या निर्मितीमुळे कामांचा वेग वाढविता येईल तसेच सध्या लातूर विभागाकडे असलेला योजनांचा भार कमी करुन तो बीड मंडळ कार्यालयात वर्ग करण्यात येईल. व उस्मानाबाद जिल्हयातील कामे बीड मंडळ कार्यालयाकडे वर्ग करुन बीड मंडळ कार्यालयास पुरेसे काम राहील. अशा प्रकारे बीड येथे मंडळ कार्यालयाची निर्मिती केल्याने बीड उस्मानाबाद व लातूर येथील कामांचा वेग वाढविणे व शासनाचे उदिष्टांची पुर्ती करणे अधिक सोईचे होईल असे ठरवून कार्यक्रम बाब सर्वानुमते मंजूर करण्यात आली व शासनास मंजूरीसाठी पाठवावे असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.5 : महा. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता परिसर प्रकल्प स्लाईस क्र.5, पॅकेज–2.**
**चितळी ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जिल्हा–अहमदनगर.**
**मे. परफेक्ट इंजि. असो. असो. प्रा.लि.. मुंबई या कंत्राटदाराच्या मागणीबाबत.**

मुख्य अभियंता (जा.बँक प्रकल्प) यांनी कार्यक्रम बाबीचे सविस्तर स्पष्टीकरण केले. सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जमीन ताब्यात नसतांना निविदा काढावयास नको होती आणि आता प्रस्तावित केल्याप्रमाणे 95–96 च्या दरसूचीवर 45.90 टक्के जादा इतक्या दराने निविदेचे दर सुधरित करावयाचे असतील तर त्यावर पुन्हाः भाववाढ देऊ नये. यापैकी पहिल्या मुद्यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे स्पष्टीकरण दिले की, निविदा प्राप्त होण्यापूर्वी शासनाच्याच दुस–या महामंडळाने (म्हणजे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने) त्यांच्या मालकीची असलेली व चितळी पाणी पुरवठा योजनेसाठी हवी असलेली संबंधित जमीन देण्यास त्या महामंडळाची हरकत असणार नाही असे लेखी कळविले होते. त्यामुळे निविदेमध्ये या योजनेचाही सामावेश करण्यात आला. मात्र त्यानंतर सदर जमिनींच्या काही प्रकरणामुळे प्रत्यक्ष हस्तांतरणास विलंब झाला. त्यावर या प्रकरणी जे झाले त्यावरुन धडा घेऊन यापुढे अशा जमिनी प्रत्यक्ष ताब्यात मिळाल्याशिवाय निविदा बोलावू नये अशा सूचना मा.उपाध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दिल्या. दुस–या मुद्यावर श्री.सुरेश पटवर्धन, तांत्रिक सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी निविदेतील शर्तीनुसार भाववाढ द्यावी लागेल. अशा प्रकरणी जागतिक बँकेचे काय मत आहे असे श्री.पटवर्धन यांनी विचारले. त्यावर, " दरातील वाढ वगैरे विषयी संबंधित संस्थांनीच निर्णय घ्यावा आणि अशा प्रकारच्या दरवाढीसहित निविदेची किंमत 15 टक्के पेक्षा जास्त होत असल्यास जागतिक बँकेची त्या जादा खर्चास परवानगी घ्यावी " असे जागतिक बँकेने कळविल्याचे मुख्य अभियंता (जा.बँक प्रकल्प) यांनी सांगितले. <u>शेवटी सर्वानुमते असे ठरविण्यांत आले की.</u>

1) चितळी पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील कामांचे सर्व दर 1.334 पट वाढवून त्या नवीन दराने ठेकेदारास देयके द्यावीत.

2) निविदेतील अटी व शर्तीनुसार ॲस्कलेशन ठेकेदारास देय राहील.

(21)

कार्यक्रम बाब क्र.6:– वैणा पाणी पुरवठा केंद्र, जिल्हा–नागपूर.

सन 199 -98 मधील पाणी टंचाई निवारणार्थ तातडीची उपाययोजना.

या बा चर्चा करतांना कल्पामधून जेवढे जादा पाणी लागणार आहे ते वाढवून मिळण्यासाठीचा प्रस्ताव बंधारे विभागाक पाठवावा. ordnance फॅक्टरीला खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत कळवावे असे अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सुचित केले.

नागपूर पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्थेची कामे धीम्या गतीने चालू असल्याचे सदस्य नी निर्दशनास आणून दिले. याबाबत नागपूर येथेच संबंधितांची सभा बोलवावी असे सुचविण्यात आले.

त्यानंतर कार्यक्रम बाब क्र.6 मंजूर करण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.7 :– मंत्रीमंडळाने महा. जीवन प्राधिकरणासाठी मंजूर केलेल्या प्रादेशिक मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता इत्यादि कार्यालयासाठी सहाय्यक कर्मचारी वर्ग निर्माण करणे.

सदर र्यक्रम बाबीन्वये ण करावयाची प्रादेशिक मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता इ. कार्यालयांसाठी स क कर्मचारी व र्माण करण्याची आवश्यकता सभेच्या निर्दशनास सदस्य सचिवांनी आणून दिली. च बाबीवर चर्चा ना श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य यांनी असे प्रतिपादन केले की, अशा प्रकारच्या कार्यक्रम बाबी मंजुरीसाठी सादर करतांना त्या बाबीमुळे होणा–या आर्थिक बाबी (वार्षिक खर्च) तसेच प्राधिकरणास प्राप्त होणारे अी.टी.पी. चार्जेस व प्रत्यक्ष खर्च याचा विचार केला पाहिजे. यावर मा.उपाध्यक्ष यांनी ही पदे किती वर्षासाठी आवश्यक आहेत याबाबत विचारणा केली व आवश्यक असलेली नवीन पदे फक्त सार्वजनिक बांधकाम/पाटबंधारे विभाग व इतर विभागाकडून काही कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेऊन भरण्यांत यावीत असे ठरले.

टेबल कार्यक्रम बाब क्र.1 :– महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 1995–96 चा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मंजुरीबाबत.

प्राधिकरणाच्या सन 95–96 च्या वार्षिक लेखापरिक्षण अहवालासंबंधी माहिती सभेपुढे सादर केली असता त्यावर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, महालेखाकार मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला रिपोर्ट पाहता त्याती याच शे–यांची कमाची पुर्तता पुढील वर्षाचे अहवालात समायोजित करण्यात येईल असा उल्लेख ना आहे यावर करणा सदस्य सचिव (प्रशासन) यांनी याबाबत असे स्पष्ट करण्यात केले की, स र लेखापरिक्षण वाल हा अनुपालनासाठी प्रमाणित केलेला अहवाल असल्यामुळे अशा त्यातील शे–यांची पूर्तता ही लेख्यांच्या समायोजनाशी संबंधित असल्याने अशा प्रकारच्या लेख्यांचे समायोजन हे परिक्षण अहवालाच्या पुढील वर्षाच्या लेख्यामध्ये समायोजित करण्यासाठी असल्याने तयांनी निर्माण केलेले मुद्यांच्या पुढे त्याप्रमाणे पुढील वर्षाच्या वार्षिक अहवालात समायोजजित करण्याचा उल्लेख करण्यात आला आहे . यास सर्वानुमते संमती दर्शवून सन 95–96 च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास मंजुरी देण्यात आली. मंजुरीनंतर सदर अहवाल शासनाकडे पाठवून तो विधिमंडळापुढे सादर करण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.2 :– खुलताबाद गिरीस्थान नगरपरिषद (जिल्हा–औरंगाबाद) पाणी पुरवठयाचे दर कमी करणे.**

सदर बाबीवर चर्चा होऊ न शकल्याने ही कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात आली.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.3 :– जागतिक बँक प्रकल्पांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील बीड जिल्हयातील केज धारुर प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी ठेवण्यासंबंधी केज धारुर तालुक्यातील जनतेची मागणी.**

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत पूर्ण करण्यांत आलेल्या बीड जिल्हयातील केज–धारुर
प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमधून (अंतर्गत 13 गांवे व 1 शहर) सर्व गावांना पाणी पुरवठा चाचणी स्वरुपात
सुरु केला असून सदर योजना जिल्हापरिषद / ग्रामपंचायतींने ताब्यात घ्यावयाची आहे. या योजनेसंदर्भात
सर्वश्री आदिनाथ नवले पाटील, माजी आमदार, अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, केज, श्री. राजाभाऊ जाधव,
शिवसेना केज तालुका व श्री.शिवाजी ग्यानबा गायकवाड, पत्रकार यांनी सदर योजना जिल्हापरिषद /
ग्रामपंचायतींकडून व्यवस्थित चालविली जाणार नसल्याने ती महा. जीवन प्राधिकरणाने राबवावी याबाबत
दिलेल्या निवेदनाची माहिती मुख्य अभियंता, नाशिक विभाग यांनी सभेपुढे सादर केली. यावर अपर मुख्य
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे निदर्शनास आणून दिले की, शासनाच्या धोरणानुसार पूर्ण
झालेल्या पाणी पुरवठा योजना जिल्हापरिषद/ग्रामपंचायतींनी ताब्यात घेऊन त्यांचे स्तरावर चालवावयाच्या
आहेत. त्यामुळे प्रथम ही योजना जिल्हापरिषदेने ताब्यात घेणे आवश्यक आहे. यावर मा.अध्यक्षांनीही सहमती
दर्शविल्यानंतर सर्वानुमते असा निर्णय घेण्यांत आला की, शासनाच्या धोरणानुसार जागतिक बँक प्रकल्पांतर्गत
केज–धारुर प्रादेशिक पाणी पुरवठा योजना देखील जिल्हापरिषद, बीड यांनीच ताब्यात घेऊन योजनेची
देखभाल करावी.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.4 :– महा. जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पर्वती सर्व्हे नंबर 114 (पुणे सिंहगड रस्त) पुणे मधील काही जागा पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबत.**

**टेबल कार्यक्रम बाब क्र.5 :– सिमेंटचा पुरवठा व विभागवार वितरण व्यवस्था :**

**टेबल कार्यक्रम बाब क्र.6 : अधीक्षक अभियंता महा.जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर करिता चंद्रपूर येथे कार्यालयीन इमारत बांधणेबाबत.**

या तिन्ही बाबींवर चर्चा न होऊ शकल्याने या तिन्ही बाबी पुढे ढकलण्यात आल्या.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.7 :– महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीचा आढावा (वर्ष 1997–98)**

प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीची माहिती सभेपुढे ठेवल्यानंतर मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन
प्राधिकरण यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीची शासनास जाणीव असून त्याप्रमाणे
प्राधिकरणास तातडीने निधी मुक्त करण्याचे दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. याशिवाय मुंबई बँकेकडून 100
कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्नही चालू आहे. याशिवाय मुंबई महानगर प्रदेश विकास
प्राधिकरणाकडूनही सुमारे रु. 100 कोटी आणि सुमीटोमो बँकेकडून 1000 ते 1200 कोटी रुपये उपलब्ध करुन
देण्याचे प्रयत्नही चालू आहेत.

17

(८)

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी या संदर्भात असे निदर्शनास आणून दिले की, रु. 53 कोटीचे अनुदान शासनाने नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी वितरीत केल्याचे आदेश आजच निघाले आहेत.

saba-76/